**:– नियमित दिवाणी मुकदमा क्र. २३/२०२५ मधील नि. १९ वरील आदेश–:**

(अनिल गोविंद प्रभुगवाणकर विरुध्द रविंद्र भगवान पालव व. ५ )

प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रकिया संहिता क्रम ३९, नियम ७ नुसार दावा विषयक रस्त्याची पाहणी करुन त्याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करणेसाठी तज्ञ व्यक्तीची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करावी याकरीता दाखल केला आहे.

०२) प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी असे कथन कले आहे की, दावा मिळकतीमधून कोणत्याही रस्त्याचे काम किंवा अनाधिकृत अतिक्रमण स्वतः अथवा आपल्या हस्तकांमार्फत प्रतिवादींनी करु नये अशा कायमच्या ताकिदीसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी कैफियत देऊन वादीचा दावा नाकारला व दावा मिळकतीत रस्ता असल्याचे प्रतिपादन केले. तसेच त्यासोबत गाव नमुना नं. २६ चा उतारा व रस्त्याचे फोटो हजर केले आहे. निशाण ५ वर ता. २७/०२/२०२५ रोजी अंशतः युक्तीवाद झाला. त्यावेळी वादीने असा युक्तीवाद केला की जर प्रतिवादींचे म्हणणे असे आहे की रस्ता आहे, तर मग तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणारे नाही. प्रतिवादीतर्फे युक्तीवाद करण्यात आला की जर तुर्तातुर्त ताकिद अर्ज मंजूर झाला तर त्याचा गैरफायदा घेऊन वादी दावा मिळकतीमधील आजमितीस असलेला रस्ता जे.सी.बी.च्या सहाय्याने खणून नष्ट करतील व तसे झाल्यास तुर्तातुर्त ताकिद अर्जावरील आदेशाचा गैरफायदा घेऊन कोर्टाची दिशाभुल व फसवणूक केल्यासारखे होईल. वादी यांनी दावा आणलेला असल्यामुळे दावा मिळकतीतील रस्त्याबाबत निःसंदिग्ध प्लिडींग करणे आवश्यक होते. परंतु एकीकडे रस्ता नाकारायचा, तर दुसरीकडे दाव्यासोबत रस्त्याचा नकाशा हजर करायचा. त्यामुळे वादग्रस्त रस्त्याबाबत खरी परिस्थिती न्यायालयासमोर येणे अत्यंत आवश्यक आहे. सबब, कोर्टाला योग्य वाटेल अशा तज्ञ व्यक्तींची याकामी नेमणूक करुन त्यांनी प्रत्यक्ष दावा मिळकतीमध्ये जाऊन दावाविषयक वाटेची

पाहणी करुन त्याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल या न्यायालयाला सादर करण्याचे आदेश व्हावेत अशी प्रतिवादीतर्फे विनंती केली आहे.

०३) वादीने नि.२० येथे आपले म्हणणे दाखल करुन सदर अर्जास विरोध दर्शविला आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी दाखल केलेला सदरचा अर्ज हा वेळ काढण्यासाठी दाखल केलेला आहे. नि. ५ चा अर्ज मेरीटवर चालून नि. ५ निकालावर आहे. अशा परिस्थितीत दिलेला अर्ज हा फेटाळण्यास पात्र आहे. सदर अर्जातील सर्व मजकूर हा धादांत खोटा व खोडसाळ आहे. तसेच, सदरचा अर्ज हा या स्टेजवर देता येणारा नाही. कारण अर्ज अत्यंत चुकीच्या पद्धतीने दिलेला आहे. करीता सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा व अर्ज चुकीचा दिल्याने COST करणेत यावी अशी विनंती केली आहे.

०४) अर्ज व त्यावरील म्हणणे तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५) वादीच्या दाव्यातील कथनांनुसार, प्रस्तुतचा दावा वादीने दावा मिळकतीमधून कोणत्याही रस्त्याचे काम किंवा अनाधिकृत अतिक्रमण स्वतः अथवा आपल्या हस्तकांमार्फत प्रतिवादींनी करु नये अशा कायमच्या ताकिदीसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. तसेच, वादीने सदर दाव्याचे अनुषंगाने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेचे उपरोक्त तरतुदीचे अवलोकन केले असता त्यामध्ये "*एखाद्या दाव्यातील विषय वस्तु असलेली किंवा त्या दाव्यात जिच्या संबंधात कोणताही प्रश्न उपस्थित होईल अशी कोणतीही मालमत्ता अटकाऊन ठेवणे, तिचे जतन किंवा पहाणी करणे इत्यादीसाठी आदेश देता येईल*" असे नमुद केलेले आहे.

०६. वादी यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये केलेल्या कथनांचे अवलोकन केले असता, त्यांनी दावा मिळकतीतील रस्त्याबाबत केलेली कथने ही संदिग्ध असून

त्यावरुन वादग्रस्त रस्त्याबाबतची खरी वस्तुस्थिती अभिलेखावर येणे आवश्यक आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश XXXVIX नियम ७ अन्वये तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज गुणदोषावर न्यायनिर्णीत करणेच्या दृष्टीने दावा विषयक रस्त्याची वस्तुस्थिती अभिलेखावर येणे आवश्यक आहे. सदर तरतुदीनुसार, प्रस्तुत दाव्यातील विषयक वस्तु म्हणजेच दावा विषयक रस्ता याबाबत प्रश्न उपस्थित झालेला आहे व त्यादृष्टीने सदर दावा विषयक रस्त्याच्या वस्तुस्थितीची पहाणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे तज्ञ व्यक्ती म्हणुन उप अधिक्षक, भुमी अभिलेख यांची नेमणुक करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सबब, माझे उपरोक्त विवेचनानुसार उप अधिक्षक भुमी अभिलेख यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करणे मला संयुक्तीक वाटते. करिता वादीचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे . सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. उप अधिक्षक, भुमी अभिलेख कुडाळ यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करण्यात येत आहे.

३. उप अधिक्षक, भुमी अभिलेख कुडाळ यांना असे निर्देशीत करणेत येते की, त्यांनी कमीशनपुर्व नोटीसा संबंधीताना काढून दावा मिळकत स.नं. ६१ हि.नं. ५ व स.नं. ६२ हि.नं. ४ यामधील दावा विषयक मिळकतीची प्रत्यक्ष जागेवर पहाणी करुन रस्त्याबाबत वस्तुस्थिती दर्शविणारा तसेच दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण असल्यास त्याबाबतचा सविस्तर अहवाल व अतिक्रमणाचा भाग दर्शविणारा नकाशा तसेच सोबत जाबजबाब व पंचयादी तसेच पंचनामा करुन त्याप्रमाणे सविस्तर अहवाल दोन महिन्याचे आत न्यायालयात सादर करावा.

४. उभय पक्षकारांनी कोर्ट कमीशनर बोलवेल त्यादिवशी त्यांचे

समक्ष मोजणीचे वेळेस उपस्थित रहावयाचे आहे. प्रतिवादी यांनी मोजणीच्या अनुषंगाने आवश्यक असणारी कागदपत्रे द्यावयाची आहेत.

५. कोर्ट कमिशनर नेमणुकीसाठी येणारा खर्च प्रतिवादीने उप अधिक्षक, भुमी अभिलेख कुडाळ यांचे कार्यालयात जमा करावयाचा आहे.

६. प्रतिवादीने न्यायालयीन आयुक्त यांचे शुल्क भरल्यानंतर कमीशनपत्र तात्काळ उप अधिक्षक भुमी अभिलेख कुडाळ यांना आवश्यक कागदपत्रासह जारी करण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2025.05.02 19:40:57 +0530

ठिकाण : कुडाळ (पी. आर. ढोरे )

दिनांक ०२/०५/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश(क.स्तर), कुडाळ